दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




**आजचा सुविचार**

जो मनुष्य मरायला तयार होतो
ती कधीच मरत नाही...
आणि जो मरायला भितो
तो आधीच मेलेला असतो...
– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

वर्ष : ०५ | अंक : ४९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०३ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## एसटी ची भाडेवाढ रद्द !



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, ठाणे :** राज्यातील पूर परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने केलेली १० टक्के दरवाढ रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री यांना दिल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे माध्यमांशी बोलत होते. ते म्हणाले की, एस टी महामंडळ दरवर्षी दिवाळीच्या काळात दहा टक्के भाडेवाढ करीत असते. यातून साधारणपणे महामंडळाला ३० कोटी रुपयांचा महसूल मिळतो. मात्र यंदा राज्यात निर्माण झालेली पूर परिस्थिती लक्षात घेवून अपवाद म्हणून महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के भाडेवाढ रद्द करण्याबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निर्णय घेण्याचे निर्देश दिल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

## दसऱ्याच्या निमित्ताने ट्रॅक्टर धुवायला गेले, नियतीनं घात केला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, छत्रपती संभाजीनगर :** दसरा सणानिमित्त ट्रॅक्टर धुण्यासाठी गेलेल्या चौघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना जिल्ह्यातील वाळूज परिसरातील गंगापूर तालुक्यातील लिंबे जळगाव येथे आज दुपारच्या सुमारास घडली आहे. इमरान इसाक शेख हा दसऱ्यानिमित्त आज दुपारी शेतालगत असलेल्या गायरान जमिनीमधील मुरूम उपसल्यानंतर पडलेल्या खड्ड्याच्या पाण्यात ट्रॅक्टर धुण्यासाठी गेला होता. त्याच्यासोबत कुटुंबातील इमू पठाण, जोहान पठाण आणि गौरव तारक ही तीन लहान मुले होती. ट्रॅक्टर धुवून झाल्यानंतर ही तीन लहान मुले आंघोळीसाठी पाण्यात उतरली. अचानक ती मुले बुडत असल्याचं बघून इमरान त्यांना वाचवण्यासाठी पाण्यात उतरला. मात्र, पाणी जास्तच खोल असल्यामुळे चौघांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर ही घटना घडल्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासनाने व मुलांच्या कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. दसऱ्याच्या सणादिवशीच मुलांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळल्यानं सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांत मराठवाड्यात मुसळधार पाऊस पडल्याने नद्यांना पूर आला आहे. तर, नदी, नाले, ओढे आणि तलावही भरुन वाहत आहेत. त्यामुळेच, वाहत्या पाण्यात जाऊ नका, पाण्याशी खेळू नका असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. मुरूम उपसाच्या खड्ड्यात बुडून या चार मुलांचा मृत्यू झाल्यामुळे गावकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे. या घटनेमुळे एक बाब समोर येत आहे. गायरान जमिनीवर सुरू असलेला मुरूम वाहतूक वैद्य आहे की अवैध? आहे याबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. हा उपसा अवैध असेल तर याच्यावर कारवाई होणार का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

## अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरने चिरडलं



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, बुलढाणा :** आज सर्वत्र विजयादशमी दसऱ्याचा उत्साह साजरा होत असताना दिवसाची सुरुवात मात्र जिल्ह्याकरता अत्यंत स्तब्ध करणारी ठरली आहे. अपघातात एका अल्पवयीन मुलीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.

ऐन दसऱ्याच्या दिवशी बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील सावरगाव नेहू गावावर शोककळा पसरली आहे. गावातील एका अल्पवयीन मुलीचा अवैध रेती वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टरने बळी घेतला आहे. आज सकाळी प्रातः विधीसाठी गेलेल्या १५ वर्षीय गायत्री संजू खंडारेला भरधाव आलेल्या ट्रॅक्टरने चिरडले, ज्यात जखमी झाल्याने तिचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर संपूर्ण गावकरी संतप्त असून मंडळ अधिकारी तसेच तलाठी या दोघांनाही निलंबित करण्याची मागणी केली जात आहे.

## घराशेजारी दसरा मेळावा असताना राज ठाकरे आले नाहीत, राऊत म्हणाले



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा आज पार पडला. हा दसरा मेळावा अतिशय भव्यदिव्य होणार अशी चर्चा होती. या दसरा मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे देखील उपस्थित राहणार अशी चर्चा होती. दोन्ही बंधू एकत्रित शक्ती प्रदर्शन करणार अशी चर्चा होती. पण तसं काहीच घडलं नाही. त्यामुळे राज ठाकरे हे उद्धव ठाकरे यांच्यासोबत राजकीय युती करणार की नाहीत? याबाबत संभ्रम निर्माण झाला. उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात राज ठाकरे यांच्यासोबत युती करणार का? यावर भाष्य केलं. आम्ही दोन्ही भाऊ एकत्र येण्यासाठी एकत्र आल्याचं आपण याआधीच बोलल्याचं उद्धव ठाकरे म्हणाले. त्याआधी संजय राऊत यांनी राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' निवासस्थानाचा उल्लेख करत महत्त्वाचं वक्तव्य केलं.

शिवसेनाप्रमुख बाळासाहे ठाकरे यांचं आपल्याकडे लक्ष आहे. ६८ वर्षांपूर्वी शिवसेना प्रमुखांनी शिवसेनेची जी ठिणगी टाकली त्याचा हा पेटलेला वणवा मुसळधार पावसात सुद्धा विझू शकत नाही हे आपला संपूर्ण देश पाहतोय. आतापर्यंत नेत्यांची भाषण झाली की मग पाऊस पडता. पण या इथे पाऊस, वादळ असताना हा मेळावा आपण करतोय आणि हजारोंच्या संख्येने आपण इथे जमलेला आहात. हे शिवतीर्थ आपलं आहे आणि शिवतीर्थ फक्त आपल्या शिवसेनेचं आहे. या शिवतीर्थाच्या पलिकडे आणखी एक शिवतीर्थ आहे. ते सुद्धा आपलंच मानायला पाहिजे, असं संजय राऊत म्हणाले.

हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुखांनी ज्या शिवसेनेची स्थापना या शिवतीर्थावर केली, त्या शिवसेनेचा दसरा मेळावा ही महाराष्ट्राची परंपरा आहे. मराठी माणसाची भक्कम एकजूट ज्या शिवसेनाप्रमुखांनी केली त्या शिवसेनेला हादरे देण्याचा प्रकार कुणी कितीही केला तरी त्या हादऱ्यामध्ये आपण संपून जाणार आहात. मला आज अनेकांनी प्रश्न विचारले, शंका उपस्थित केल्या. शिवतीर्थावर चिखल झालेला आहे म्हणजे तुम्ही चिखलफेकच करणार. मी म्हटलं, होय. गद्दारांवर चिखलफेकच करणार. त्यांची तीच लायकी आहे, असा घणाघात संजय राऊत यांनी केला.

संपूर्ण महाराष्ट्रात ओला दुष्काळ आहे. मराठवाडा संपूर्ण पाण्यात आणि चिखलात आहे. आठ-आठ दिवस शेतकरी चिखलात आहे. आपण दोन तास पाण्यात आणि चिखलात ही सभा घेतली तर आपल्याला वाईट वाटण्याचं कारण नाही. महाराष्ट्रात ओला दुष्काळ असेल तर हा आमचा ओला दसरा मेळावा आहे, असं संजय राऊत म्हणाले.

रावणाचा आज अंत करायचा आहे. नेहमी रावणाचं दहन होतं. आता या पावसात रावणाचं दहन कसं करायचं, रावणाला जाळायचं की रावणाला बुडवायचं हा विचार करावा लागेल. या मुंबईत पाऊस आहे. या मुंबईत रावणाला बुडवायचा आणि दिल्लीतल्या रावणाला जाळायचा, असं राऊत म्हणाले.

उद्धव ठाकरेंनी शस्त्र पूजा केली आहे. शस्त्रपूजा करण्याचा अधिकार हा हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला आहे. मला विचारलं गद्दारांच्या मेळाव्यात पूजणार? मी म्हटलं त्यांना शस्त्र पूजा करण्याचा अधिकार असूच शकत नाही. मग ते काय पूजणार? मला सांगण्यात आलं, त्यांनी दिल्लीतून अमित शाह यांचे जोडे आणले आहेत. चपला आणल्या आहेत. त्यांचं पूजन ते करणार आहेत. आम्ही शस्त्र पूजा केली. ते अमित शाह यांच्या पादुकांच्या पूजा करत आहेत. जो तो आपल्या लायकीनुसार वागतो आणि जगतो. हा निष्ठावंतांचा मेळावा आहे, असं भाषण संजय राऊत यांनी केलं.

## शिवछत्रपतींच्या सुंदरगडावर शाही दसरा...



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०२, पाटण :** पाटण महालातील प्रमुख असलेल्या सुंदरगड (दात्तेगड) वर दसऱ्याचे तोरण बांधून सरदार घराण्यातील श्रीमंत सत्यजितसिंह पाटणकर यांच्या हस्ते शस्त्र पूजन, सीमोल्लंघन करण्यात आले. यावेळी गडपुजन, गडावरील ध्वज पुजन, देव-देवतांचे पुजन करण्यात आले. इतिहासाची साक्ष असणारा पाटण महालातील सुंदरगड हे पाटण तालुक्याचे ऐतिहासिक वैभव आहे. या वैभवाचे संवर्धन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार-अचार आणि धार्मिक परंपरा याचे जतन सुंदरगड संवर्धन समितीच्या मावळ्यांच्याकडून होत असल्याने गड व गड परिसरात पर्यटनाला मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध झाल्या आहेत. गड पर्यटनाच्या माध्यमातून शिवकालीन इतिहास आजच्या पिढी समोर येत आहे. याचा सार्थ अभिमान वाटत असल्याचे श्रीमंत सत्यजितसिंह पाटणकर यांनी सांगितले.

यावेळी पाटणचे वनक्षेत्रपाल राजेश नलवडे, पाटण पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक राजेंद्र सदगर, वनपाल निलेश कुंभार, सुंदर स्वराज्य प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष यशवंतराव जगताप, शिवप्रेमी मनोहर यादव, शंकर मोहिते, लक्ष्मण चव्हाण, राम साळुंखे, वनरक्षक निखिल कदम, सह्याद्री प्रतिष्ठान गड संवर्धनचे सुशांत फडतरे, दत्तात्रय सुर्यवंशी, पोलिस कॉन्स्टेबल मच्छिंद्र जाधव, मयुर राक्षे, रोहित लोहार, राम मोटे, मेघराज नवले, संजय जाधव, दिपक कोळी, यांची प्रमुख उपस्थिती होती.

सरदार घराण्यातील श्रीमंत सत्यजितसिंह पाटणकर पुढे म्हणाले पाटण महालातील सुंदरगड हा पाटणच्या शिवकालीन इतिहासाची साक्ष आहे. शिवकाळात पाटण महालात पाच हजार घोड्यांची मनसब होती. या पाच हजार घोडेस्वारीत तालुक्यातील प्रत्येक घरातील व्यक्ती सैनिक होता. इतिहासातील पुर्वजांचे योगदान आजच्या काळात विसरता येणार नाही. आपल्या पुर्वजांची आठवण मनात जतन ठेवून आपल्या परिसरात असणाऱ्या सर्व गडकिल्ल्यांचे जतन व स्वरक्षण होणे गरजेचे आहे. हेच कार्य आपल्या पुढच्या पिढीला इतिहास शिकवतील असे त्यांनी सांगितले.

यावेळी शिवप्रेमी मनोहर यादव, राजेश नलवडे वनक्षेत्रपाल पाटण, लक्ष्मण चव्हाण, सुशांत फडतरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुंदरगडावरील शस्त्र पूजन कार्यक्रमास सुंदरगड संवर्धन समिती, सह्याद्री प्रतिष्ठानचे शिवमावळे, ग्रामस्थ परिसरातील आबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्व उपस्थितांनी सुंदरगड (दातेगड) खंजीर दरवाजातील गड देवता श्रीगणेश, हनुमान, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे दर्शन घेऊन आपट्याच्या पानांचे सोन लुटलं व एकमेकांना सोन देऊन दसऱ्याच्या शूभेच्छा दिल्या.

**शिवमावळ्यांकडून गडावर एक तास स्वच्छता करुन रांगोळी, हार-फुलांची सजावट**

सुंदरगड (दातेगड) किल्ल्यावर शाही दसऱ्याच्या उत्सवासाठी उपस्थित राहिलेल्या सह्याद्री प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, सुंदर स्वराज्य प्रतिष्ठान सुंदरगड संवर्धन समितीचे मावळ्यांनी किल्यावर एक तास स्वच्छता मोहीम राबवली. तलवार विहीर पायऱ्या, खंजीर दरवाजा पायऱ्यांवरील वाढलेले गवत काढले. गड परिसरात झालेला प्लॅस्टिक कचरा गोळा केला. गणपती, हनुमान देवदेवतांचा परिसर स्वच्छ करुन याठिकाणी रांगोळी हार-फुलांची देखणी सजावट केली.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबद्दल महत्त्वाची अपडेट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** राज्यातील महापालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा यांच्या निवडणुका ह्या गेल्या तीन ते चार वर्षांपासून रखडल्या आहेत. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने आता ३१ जानेवारी २०२६ पर्यंत या सर्व निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्यानुसार निवडणूक आयोगाने निवडणुकीसाठी आवश्यक असलेल्या मतदान यंत्राच्या उपलब्धतेनुसार पहिल्या टप्प्यात दिवाळीनंतर म्हणजेच नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या निवडणुका घेऊन जानेवारी महिन्यात सर्व महापालिकांच्या निवडणुका घेण्याचे नियोजन केलेले आहे.

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्यपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याची घोषणा राज्य



निवडणूक आयोगाने केली आहे.

त्यासंदर्भात निवडणूक आयोगाने तयारीला सुरूवात केली आहे. १ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदारसंघ आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर केला. ३० ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत राज्यातील सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना कळवले आहे. विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफिसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा असेही राज्य निवडणूक आयोगाने कळवले आहे.

**निवडणूक संदर्भात कार्यक्रम...**

६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमातीकरिता जागा निश्चित करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव तयार करून विभागीय आयुक्तांकडे सादर करणे.

८ ऑक्टोबर २०२५ पर्यंत अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीकरिता राखीव जागांच्या प्रस्तावास मान्यता देणे.

१० ऑक्टोबर २०२५ आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे. (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला, अनुसुचित जाती, अनसचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग

१० ऑक्टोबर २०२५ आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे. (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील व सर्वसाधारण महिलांसहबाबत)

१३ ऑक्टोबर २०२५ जिल्हा परिषद गटासाठी आणि पंचायत समिती गटासाठी आरक्षण सोडत.

१४ ऑक्टोबर २०२५ प्रारूप आरक्षणाची अधिसुचना प्रसिद्ध करणे.

१४ ते १७ ऑक्टोबर २०२५ जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील प्रारूप आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी.

२७ ऑक्टोबरपर्यंत प्राप्त प्रारूप आरक्षणावरील हरकती व सुचना आधारे अभिप्रायासह गोषवारा विभागीय आयुक्त यांना सादर करणे.

३ नोव्हेंबर २०२५ रोजीपर्यंत प्रारूप आरक्षणावर प्राप्त हरकती व सुचनांचा विचा करून आरक्षण अंतिम करणे.

३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे.

## संपादकीय

### माणूस आणि यंत्र

भारतीय हवाई दलात सहा दशके सेवा बजावलेली मिग २१ ही बहुचर्चित विमाने दोन दिवसांपूर्वी चंडीगड हवाई दल तळावर समारंभपूर्वक निवृत्त झाली. विमानांनी हवेत तिरंगी धूम्ररेषा उमटविल्या. विमानांचे संचलन पाहण्यास संरक्षणमंत्री राजनाथसिंह उपस्थित होते. हवाईदल प्रमुख एअरचीफमार्शल अमरप्रीतसिंग हे 'मिग २१'च्या अखेरच्या उड्डाणात वैमानिक म्हणून सहभागी झाले होते. ज्या उडत्या यंत्राच्या अंगाखांद्यावर आपण खेळलो, वाढलो त्या यंत्राला हवाईदल प्रमुख या नात्याने निरोप देताना वायुवीराच्या मनात हळवे भाव दाटून येणे स्वाभाविकच.

यानिमित्ताने विविध वायुवीर, नौदल अधिकारी, सैनिक यांचे त्यांनी सेवा बजावलेल्या युद्धनौका, उडविलेली विमाने, नेतृत्व केलेले रणगाडे यांच्याशी कसे नाते तयार होत असेल, याविषयी वेळोवेळी झालेल्या संवादाचे स्मरण झाले. यंत्रे कितीही प्रगत झाली, तरी ती हाताळणारा सैनिक, त्याचे कौशल्य, त्याची चिकाटी, जिगर हे महत्त्वाचे, असे सैनिकी क्षमतांबाबत म्हटले जाते, ते तर खरेच. यंत्रांच्या कितीही मर्यादा असल्या, तरी आपल्या भारतीय सैनिकांनी त्यावर मात करून ईर्षेने विजयश्री खेचून आणली, असे अनेक प्रसंग आहेत. तरीही शेवटी यंत्रांवर सैनिकाची भिस्त असतेच, त्यामुळेच या यंत्रांशी त्यांचे भावनिक नाते दृढ होत जाते. मिग २१ विमानांचेच उदाहरण द्यायचे, तर ६३ वर्षांमध्ये ८०० हून अधिक विमानांनी भारतीय हवाई दलातील अनेक पिढ्या पाहिल्या, घडविल्या. अशा विमानाला ताफ्यातून निरोप देताना कित्येक हवाई दल अधिकाऱ्यांच्या डोळ्यांसमोर आपल्या सैनिकी आयुष्याची कारकीर्दच उभी राहिली असेल. यानिमित्ताने २०१५मधील आयएनएस गोदावरी या फ्रिगेटची व २०१७ मधील 'आयएनएस विराट'ची सेवानिवृत्ती यांचे स्मरण झाले. भारतातच आरेखन केली गेलेली पहिली स्वदेशी बांधणीची युद्धनौका हे आयएनएस गोदावरीचे वैशिष्ट्य. तर जगभरात ५९ वर्षे इतका सर्वाधिक काळ पाण्यात तरंगती राहिलेली (त्यापैकी ३० वर्षे भारतात) विमानवाहू युद्धनौका असे, विराटचे योगदान.

युद्धनौकांचे सारथ्य केलेल्या सर्व कमांडिंग ऑफिसरना या निवृत्ती सोहळ्याचे खास निमंत्रण असते. सूर्यास्ताच्या साक्षीने तिरंगा, नौदलाचा ध्वज व निवृत्तीच्या दिवशी धारण केलेला विशेष ध्वज खाली उतरवून बँडच्या धुनेवर या नौकांना आदरपूर्वक निरोप दिला जातो. कित्येक विमाने किंवा युद्धनौकांचा सेवेचा कालावधी हा सैन्याधिकाऱ्यांच्या सैनिकी कारकीर्दीला समांतर असतो. लढाऊ विमानांची तुकडी असो किंवा युद्धनौका; त्यांच्या स्वरूपानुसार प्रत्येक यंत्रालाही एक प्रथा, परंपरा व त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कार्यसंस्कृती असते. त्या त्या वेळी त्यांच्यावर स्वार झालेले अधिकारी त्या युद्धनौकांची किंवा विमानांच्या तुकडीची कार्यसंस्कृती अंगी धारण करतात व त्याच बलस्थानांमुळे ते ओळखले जातात. मिग २१च्या पँथर्स किंवा कोब्रा या स्क्वाड्रन असोत, किंवा राजपूत श्रेणीतील युद्धनौका म्हणजे आर क्लास, १९७१ च्या युद्धात प्रथम आघाडी उघडलेल्या कॉर्व्हेट श्रेणीतील क्षेपणास्त्र नौका म्हणजे किलर स्वाड्रन अशा विविध नावांनी त्यांची ओळख असते. ते एक ईर्षेचे बीज असते. बहुधा त्यामुळेच नौदलातील युद्धनौका या भौतिकदृष्ट्या निवृत्त झाल्या, तरी त्यांचे प्राण कायम राहतात, असे मानले जाते. यानुसार नव्या आधुनिक पिढीतील युद्धनौका पुन्हा जुन्या नावानेच पुनर्जन्म घेतात. परंतु जेव्हा सामग्री व निधीच्या टंचाईमुळे किंवा नियोजनातील समस्यांमुळे एकच एक यंत्रे पुनःपुन्हा वापरावी लागतात, काही तरी जुगाड चालवून त्यांची आयुर्मर्यादा ओढूनताणून लांबवावी लागते, तेव्हा मात्र ते सैनिकांच्या जिवावरच बेतते. अशा वेळी याच यंत्रांना मग उडत्या शवपेट्यांसारखे दूषण चिकटते. विहित कालावधीच्या पलीकडे माणूसही जगत नाही; मग यंत्रे चालविण्याचा आटापिटा केल्यावर तीही मान टाकतात किंवा माणसाच्या जिवाचीच परीक्षा पाहतात. हे टाळता आले, तर यंत्र आणि माणूस दोघांचे प्राण वाचविता येतील.

# धम्मचक्र परिवर्तनाकडे ते कधी जाणार?

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष होवून गेली. स्वातंत्र्य लढ्यासाठी योगदान देणारे सैनिक, समाज सेवक, महापुरुष, संत, नेते मंडळी या सर्वाचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. त्यांनी गुलामगिरीतून मुक्त केलं आणि स्वातंत्र्याची गोड फळे चाखायचे दिवस आपल्याला उपलब्ध करून दिले. त्यांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत.

स्वातंत्र्यामध्ये प्रामुख्याने स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यावर आधारित समाज रचना तयार करण्याचा मुख्य उद्देश होता. तो काही प्रमाणामध्ये शासकीय कामात, शासकीय कार्यालयात १००% यशस्वी झाला. जिथं होत नाही तिथं कायदा असल्यामुळ तसचं व्हायला पाहीजे ही मानसिकता प्रत्येकाच्या शिक्षित मनाने स्विकारलेली दिसतेय.

पूर्वी आपल्याकडे चातुवर्ण व्यवस्था होती. जात - निहाय पारंपारीक व्यवसाय होते. बारा बलुतेदारांच्या . मदतीने गाव - गाड्यातील बऱ्याचं अडचणी सोडवल्या जात होत्या. हे वास्तव नाकारून चालणार नाही.

धर्मवेडे पणा चालिरीती, प्रथा, परंपरा ह्या प्रत्येक जण पाळत होता. त्यांच्या मध्ये जाती - जातीमध्ये रोटी - बेटी व्यवहाराला बंदी होती. हळूहळू काही माणसं असं काही राहील नाही आता असे म्हणतात.व वागतात सुद्धा पण काही कर्मठ पृक्तीचे माणसं आणि त्यांचे विचार स्वातंत्र्या च्या ७५ वर्षा नंतर ही प्रवृत्ती सोडायला तयार नाहीत याला कोण जबाबदार. ? शासन व्यवस्था की आपली मानसिकता ? याचा शोध घेण्याची आपल्यावर वेळ आली आहे.

आपल्या कडे अनेक जाती ना एकत्र करून एक समुह तयार केला. त्यावरू त्यांचे मागासपण ठरवले गेले आहे. SC, ST, OBC, GEN यामध्ये SC, ST प्रवर्गातील जात समुह विशेष मागासलेले असल्या कारणाने त्यांना इतरांच्या बरोबरीने आणण्यासाठी काही विशेष कायदे केले. जेणेकरून त्यांचे सामाजिक शोषण, वैयक्तीक शोषण, थांबले पाहीजे. व जीवन जगण्याचा स्तर वाढला पाहीजे. मान सन्मान, पद, प्रतिष्ठा यावर आधारित असलेले जीवनाचा त्यालाही आनंद उपभोगता यावा हाच मुळी चांगला उद्देश संविधान कर्त्यानी डोळ्यासमोर ठेवून मांडणी केली.

अनुसुचित जाती प्रवर्गातील काही जातीना मात्र आजही त्रास होतोय. अपमान सहन करावा लागतोय. शिक्षा भोगण्याची बेळ त्यांच्यावर येते. मन म्हणते मुक्ता साळवे यांनी वयाच्या ८ व्या वर्षी इंग्रज शासनासमोर निंबध लिहला होता. आम्ही धर्म नसलेली माणसं आहोत हे मांग - महाराच्या दुःखा विषयी ज्ञानोदय' या मासिका मध्ये ९ मार्च १८५५ रोजी प्रसिद्ध झाल. विशेष म्हणजे ज्ञानज्योती,क्रांती ज्योती सावित्रीमाई यांच्या शाळेतील ही विद्यार्थीनी होती. फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचा आणि शिक्षणाचा एक महत्वाचा भाग मानला जातो. मुक्ता साळवेनी महिला व विशेषतः दलित महीला व स्त्रियावरील अत्याचाराला वाचा फोडणारे क्रांतिकारी लिखाण केले. त्यांनी धर्म नसलेली माणसं असा उल्लेख केला आणि तो आजही खरा होताना दिसतोय.

समाजामध्ये कुत्र -मांजर जनावर नाही, मांग - महार माणूस नाही अशी एक म्हण आहे. जिचा उच्चार पूर्वीच्या काळी उच्च वर्णिया कडून केला जायचा. ही व्यवस्था टिकवून ठेवण्यासणीची वातावरण निर्मिती होती. असे आपण काही काळासाठी ग्रहीत धरले असते पण तसं दृश्य आजही दिसतंय ...

मातंग समाजाला जर इतर लोक हिंदू मानत असते तर या घटना घडल्या असत्या का? मंदीरामध्ये का गेला म्हणत मारहाण केली. उमरी तालुक्यातील रहीवाशी मिस्त्री प्रकाश माधव टिकेकर वय ४३ वर्षे व त्यांची मुलगी आसे गावातील मारोती मंदीरामध्ये दर्शना साठी गेली आणि हा प्रकार घडला. ही घटना ताजी आहे. या अगोदर अश्या घटना अनेक घडल्याची नोंद शासन दरबारी पाहावयास मिळेल यात शंका नाही.

बांधावर, शेतात, मंदीरात, घरात गेल्यावर या घटना घडलेल्या आहेत. संबधिता वर गुन्हे दाखल होतात. त्यांना शिक्षा होते का? नाही? हा प्रश्न महत्वाचा आहे. कारण खैरलांजी सारख्या प्रकरणामध्ये सर्वाची निर्दोष मुक्तता होते यावरून आपल्या न्याय प्रक्रियतिल तपास यंत्रणेवर प्रश्न उभा राहतो.

या व यासारख्या भूतकाळात घडलेल्या घटनांचा विचार करताना ही वेळ का आली याचा विचार करणे स्वाभाविक आहे. त्याची कारणे शोधली पाहीजेत. त्यावर आधारित उपायही सांगितले पाहीजेत. कारण देशामध्ये अश्या घटना घडणे हे निश्चित चं अपमानाची गोष्ट आहे. मग तो अपमान समाजाचा, विचारांचा, कृतीचा, जनजागृतीचा आहे. हे मात्र निश्चित. यावर आपल्याला काय करता येईल यासाठी विचार विनिमय ठाम होवून मार्ग काढावा लागेल. याची जबाबदारी आता कोण स्विकारणार..

अश्या घटना घडलेली काही मोजकी नावे नाहीत. आणखीन पण बऱ्याच गावात मांगा - महारांना प्रवेश नाही. सामाजिक चळवळ तिथं पर्यत पोहचली असेलही पण अपंग मानसिकते मध्ये जीवन जगणाऱ्या समाज बांधवाचा आधार कोण होणार हा महत्वाचा भाग आहे. बसवंते प्रकरणा मध्ये अनेक मोर्चे निघाले. सामाजिक एकतेचे दर्शन समाजाकडून घडविण्यात आले. याचा काही फायदा झाला.

परिवर्तनवादी विचारांची माणसं सामाजिक कार्य करत असताना असामान ता भरलेल्या, विषाच्या डोहाकडे जावू नको म्हणताना सुद्धा आपण जाता . वाईट आहे हे कळून सुद्धा, घडना कानावर असताना सुद्धा जाता आणि मार खाता याला काय म्हणावे लागेल.

बाबासाहेबानी एकूण २२ प्रतिज्ञा सांगितल्या. त्या वाचणे. त्याचे अनुकरण करणे. ही आज आपली मानसिकता बदलण्यासाठी गरजेच्या आहेत.

प्रस्तापिताच्या जवळ जावून लाथा, बुक्या, अपमान, मानहानी स्विकारावी लागतेय हे सत्य आहे. मानवी जीवना मध्ये गमावलेल्या बाबींच वैभव कधी परत मिळवून घ्यायचंय. याचा विचार आपल्याला करावा लागणार आहे. या मानसिकतेमध्ये विचारांचे अनुयायी अडकून पडू नये म्हणून बुद्ध, फुले, शाहू, आणि बाबासाहेब, अण्णाभाऊ यांचे विचार आपली मानसिकता बदलण्यासाठी उपयोगी आहेत. असे मला वाटते. या सर्व बाबींचा विचार करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकांना अवाहन करून लाखो माणसाना सोबत घेवून पिढ्यानं पिढ्याची गुलामी झुकारून दिली. रक्ताचा एकही थेंब न सांडता ही सामाजिक कांती घडवून आणली. त्या परिस्थितीमधील हा निर्णय एक आमुलाग्र बदल घडवून आणणारा ठरला तो दिवस १४ ऑक्टोबर १९६५ होय. हाच दिवस धम्म चक्र परिवर्तन दिन म्हणून आपण साजरा करतोत. त्यानंतर या कामी विचारांचा पाईक आपला समाज व्हावा. हा विचार मनाशी धरून अण्णाभाऊ म्हणतात,

रुतुनि बसला का ऐरावत
अंग झाडुनि निघ बाहेरी,
घे बिनीवरती घाव,
जग बदल घालुनी घाव,
सांगुनी गेले मज भिमराव.

आपल्या सभोवती असणारे असामनेते चे धर्मान्धतेचे, उच्च निचपणाचे कवच फोडून बाहेर निघण्या याठी अ णा भाऊंचा हा विचार मल्या वाटते सर्वोकृष्ट संबंध बहुजनासाठी आहे.

समाजाच्या मनामध्ये बऱ्याच बाबतीत शंका आहेत. मी बौद्ध धर्म स्विकारल्यावर अडचणी येतील. मी बौद्द मांग राहील. जस ख्रिश्चन मांग रहिला. असा विचार करून लोक कचरतात. मी म्हणेन तुमची मानसिकता तयार होवू दया. आपल्यावर अन्याय होत आहे. तो तशाच दिवसेन दिवस वाढत गेला तर मग बघू. यामध्ये काळ सोकावून जाणार आहे.

या दिनाच्या निमित्तानं आपण एक दिशा ठरवू या. बाबासाहेबांच्या २२ प्रतिज्ञेचे पालन करू या. ह्याचा चांगला अनुभव आल्यावरचं पुन्हा बघू.

आपण एका विचाराची पायवाट निवडावी. त्या वाटेनं चालण्याचा प्रयत्न करावा. त्या वाटेवर अन्यायाचा एकही मैल दगड आपल्याला दिसणार नाही. तर एवढ अंतर कापूण गेल्यावर सुख - समाधानाची जागा दिसणार आहे. त्या पायवाटेचा विचार करू या.

आम्ही धर्माचं नाव काढलं की, अंगाचा तिळ - पापड व्हायला लागलाय. कारण काहीही असो पण एक गोष्ट मात्र चांगली होताना दिसत आहे. की, आम्ही बाबासाहेबांच्या विचारांचे अनुयायी आहोत. त्यांचा विचार स्विकारणार ..... चांगलीच गोष्ट आहे. विचारला सुरुवात झाल्यावर एक दिवस परिवर्तनाचा रस्ता दिसेल. यात शंकाच नाही. या दिनाच्या निमित्तानं आपण अन्याय अत्याचाराला तोंड देण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करू या. समस्त, सकल मातंग समाज उभा करू या. गावा, गावात अन्याय होत नाही कारण,जिथं सक्षम आहोत तिथं अन्याय नाही. जिथं सक्षम समाज नाही. तिथं हे चित्र दिसतय त्यामुळे आपण विचारनं सक्षम होवू या.

हेच खऱ्या अर्थान धम्म चक्र परिवर्तन दिन साजरा करण्याच्या दिशेने उचलले ले पाऊल म्हणावं लागेल.

**- एकनाथ पलमटे**
**लसाकम, लातूर ८३७९०८३१००**

# द. मा गेले ; साहित्यातील मिरासदारी संपली

मराठी साहित्यातील जेष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांचा काल म्हणजे २ ऑक्टोबर रोजी चौथा स्मृतीदिन होता. चार वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २ ऑक्टोबर २०२१ रोजी त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारी पर्वाचा अंत झाला असेच म्हणावे लागेल. द. मा. मिरासदार हे मराठीतील प्रख्यात विनोदी लेखक व कथाकथनकार होते.

१४ एप्रिल १९२७ रोजी त्यांचा जन्म झाला. द. मा मिरासदार यांचे पूर्ण नाव दत्ताराम मारुती मिरासदार असे होते मात्र ते द. मा या नावानेच प्रसिद्ध झाले. द. मा मिरासदार यांनी १९५२ साली अध्यापन क्षेत्रात प्रवेश केला. पुण्याच्या कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत ते शिक्षक होते. त्याआधी काही काळ त्यांनी पत्रकारिताही केली. १९६२ सालापासून त्यांनी कथाकथनास सुरवात केली. द. मा मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील यांनी ६० च्या दशकात संपूर्ण महाराष्ट्रभर कथाकथनाचे प्रयोग केले. त्यांच्या कथाकथनाने महाराष्ट्राला अक्षरशः भुरळ घातली. द. मा मिरासदार हे विनोदी कथा सादर करायचे. त्या कथांचे लेखनही त्यांनीच केलेले असायचे.

द. मा मिरासदार यांच्या भुताचा जन्म, माझ्या बापाची पेंड, व्यंकुची शिकवणी, शिवाजीचे हस्ताक्षर, माझी पहिली चोरी, हरवल्या च्या शोध या विनोदी कथा श्रोत्यांनी अक्षरशः डोक्यावर घेतल्या. द. मा. मिरासदार यांची कथा सादर करण्याची शैली खुमारदार होती. आपल्या खुमारदार शैलीत कथा सादर करत त्यांनी महाराष्ट्राला लोटपोट हसवले. द. मा. मिरासदार यांनी विपुल प्रमाणात लेखन केले. विनोदी कथा ही त्यांची खासियत होती. द. मा. मिरासदार यांचे २४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

याशिवाय त्यांनी १८ चित्रपटांच्या पटकथाही लिहिल्या आहेत. एक डाव भुताचा या चित्रपटाची कथा- पटकथा लेखन त्यांनी केले आहे इतकेच नाही तर या चित्रपटात त्यांनी अभिनयही केला आहे. द. मा मिरासदार यांच्या विनोदी कथा ग्रामीण जीवनावर आधारित असत. ग्रामीण जीवनातील विसंगतीचे, विक्षिप्तपणाचे, इरसालपणाचे दर्शन त्यांच्या कथांतून घडत. त्यांनी केवळ विनोदीच नाही तर स्पर्श, विरंगुळा, कोणे एके काळी यासारख्या गंभीर कथाही लिहिल्या. द. मा. मिरासदार यांच्या अनेक कथांवर चित्रपट निघाले. त्यांच्या काही कथांचा समावेश शालेय अभ्यासक्रमातही करण्यात आला. त्यांना मानाचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरून न निघणारी अशीच आहे. द. मा. मिरासदार यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारीच संपली आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**द. मा. मिरासदार यांना विनम्र अभिवादन!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## ढोलकी...

काही वक्ते विनोदी
नेते डबल ढोलकी
क्रियाअसे निष्क्रीय
प्रति क्रिया बोलकी

म्हणा गेलातं उडत
वक्तव्यं करे हलकी
होऊ दे वेदना कुणां
छेलूनकाढे छिलकी

रे मोठे केवळवयाने
स्वभाव का बालकी
इच्छा देवत्वपणाची
हवीहवीशी पालखी

विनोद करावे उमदे
कोपरकळी फुलकी
मने काहींचीविषारी
कुवृत्ती अतिहलकी

विचार गुंडाळलेला
बुध्दी ठेव शिल्लकी
बदनाम करी संपूर्ण
भाषावापरु शेलकी

वेळेत संधी फायदा
मंडळी टपली बेरकी
शब्दफिरवणे सुप्रिय
हळुचं घेतात गिरकी

अवमानसोडेल दर्जा
कुटील मंडळी टरकी
शाब्दिक उध्दार करा
रमले शाब्दिकनरकी

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

## आव्हानांवर मात करूया, आपत्तीग्रस्त बांधवांना नव्या उमेदीने उभे करुया - मुख्यमंत्री

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, मुंबई :** विजयादशमीच्या सणाकडून प्रेरणा घेऊन आव्हानांवर, संकटावर मात करण्याची हिंमत बाळगुया, असे आवाहन करतानाच, विजयादशमीचे हे पर्व राज्यातील नागरिकांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि भरभराट घेऊन येवो, अशी प्रार्थना मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्याही मुख्यमंत्री फडणवीस यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

विजयादशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन यांच्या पुर्वसंध्येला मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शुभेच्छा देतानाच, राज्यात पावसामुळे अनेक भागात अभूतपुर्व बिकट परिस्थिती उद्भवली आहे. या संकटसमयी आपण सगळे एकजुटीने या आपत्तीग्रस्त नागरिकांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहूया. शेतकरी, कष्टकऱ्यांच्या मदतीसाठी सर्वतोपरी योगदान देऊया. या बांधवांना पुन्हा नव्याने उमेदीने करण्याचा निर्धार करूया, असे आवाहन केले आहे.



'विजयादशमीचा सण हा असत्यावर सत्याचा विजयाचा संदेश घेऊन येतो. या सणाकडून सकारात्मक अशी ऊर्जा घेऊया. बिकट परिस्थितीवर मात करून, अडचणीतून मार्ग काढण्यात महाराष्ट्र नेहमीच पुढे राहीला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून ते अनेक अग्रणींनी आपल्याला हाच वारसा-वसा दिला आहे. ही प्रेरणा घेऊन महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्यासाठी सज्ज होऊया. आपल्या सर्वांच्या एकजूटीतून महाराष्ट्र विकासाची पताका डौलाने फडकत ठेवण्यासाठी निर्धार करूया, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी संदेशात म्हटले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मचक्र प्रवर्तनातून विश्वाला सामाजिक समतेची दिशा दिली. हा दिवस अखंड विश्वासाठी चिरंतन प्रेरणादायी ठरो, अशी मनोकामनाही मुख्यमंत्री फडणवीस व्यक्त केली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ड्राय डे दिवशी मुर्टी येथील परमिट बिअर बार मधून चोरुन दारु विक्री

**अक्षराज : शरद भगत**

**दि.०२, मुर्टी (बारामती) :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती संपुर्ण देश भर साजरी केली जाते. या दिवशी परमिट बिअर बार पुर्णपणे बंद ठेवून ड्राय डे साजरा करण्यात येतो. बारामती तालुक्यातील मुर्टी या ठिकाणी सानिका परमिट बिअर बार, मिनाक्षी परमिट बिअर बार, अशोका परमिट बिअर बार व वाईन हाऊस असे चार बिअर बार आहेत. या बार मधून ड्राय डे दिवशी पाठी मागच्या दाराने (चोरुन) मोठ्या प्रमाणात दारु विक्री होते. महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी देखिल चोरुन मद्यविक्री करत असल्याचे आढळून आले. पोलीस प्रशासन व राज्य उत्पादक शुल्क विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याने बार मालकांना कोणत्या ही प्रकारचे भय नसल्याचे दिसून येतं आहे.

## ८ ऑक्टोबर पासून राज्यातून मान्सून निरोप घेणार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, ठाणे :** २९ सप्टेंबर पासून राज्यातील बहुतांश भागात हवामान स्थिर आहे. मात्र २ ते ७ ऑक्टोबर दरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे, जो प्रामुख्याने मेघ गर्जनेसह राहील आणि दुपारनंतर पडेल. वादळी पावसाची सर्वात अधिक शक्यता विदर्भात राहील. काढणी केलेली पिके पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावीत, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.७ ऑक्टोबरपासून राज्यात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल आणि सुमारे ८ ऑक्टोबर पासून मान्सून राज्यातून निरोप घेईल. त्यानंतर पुढच्या काही दिवसातच संपूर्ण राज्यातून मान्सून निरोप घेईल अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## घरातून लोखंडी तलवार जप्त; बल्लारपूर पोलिसांची कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर पोलिसांनी नवरात्र दुर्गा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रोव्ही/जुगार, आर्म अॅक्ट अंतर्गत पेट्रोलिंग करत असताना दि. ३० सप्टेंबर रोजी बल्लारपूर पोलीस स्टेशन चे गुन्हे शोध पथकांना गोपनीय खात्रीशीर माहिती मिळाली की, साईबाबा वार्डमध्ये राहणारा आरोपी मनिष रामप्रसाद वर्मा (वय ३८) लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने आपल्या घरी विनापरवाना लोखंडी तलवार बाळगून आहे. तत्काळ पोलिसांनी आरोपीच्या घराची झडती घेतली असता स्वयंपाक ओटयाच्या खाली ठेवलेली तलवार जप्त करण्यात आली. याप्रकरणी आरोपी विरुद्ध कलम ४, २५ आर्म अक्ट अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक बिपीन इंगळे यांचा नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक मदन दिवटे, सहायक पोलीस निरीक्षक शब्बीर पठाण, पोहवा सत्यवान कोटनाके, सुनिल कामटकर, पुरूषोत्तम चिकाटे, विकास जुमनाके, पोअं सचिन आलेवार, खंडेराव माने, मिलींद आत्राम, मपोअं शालिनी नैताम यांसह पोलीस स्टाफ यांनी अतिशय कुशलतेने पार पाडली.

## हिललाईन पोलिसांची यशस्वी कामगिरी; १५ हरवलेले मोबाईल मालकांना परत



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०२, डोंबिवली (ठाणे) :** हिललाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीतून गहाळ झालेल्या प्रॉपर्टी मिसिंगमधील विविध कंपनीचे एकूण १५ मोबाईल फोन परत मिळवण्यात पोलीसांना यश आले आहे. सीईआयआर (CEIR) प्रणालीद्वारे तांत्रिक विश्लेषण करून पोलीस शिपाई २६०० सचिन हातेकर यांनी अथक प्रयत्नांद्वारे सदर मोबाईल फोन शोधून काढले. सदर मोबाईल फोन दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश काळे यांच्या हस्ते तक्रारदारांना परत करण्यात आले. या कार्यवाहीमुळे हिललाईन पोलीस ठाण्याचा जनतेवरील विश्वास अधिक दृढ झाला असून तक्रारदारांनी पोलीस दलाचे आभार मानले आहेत.

## शालेय विभागीय तायक्वांडो स्पर्धेत मंद्रूपच्या तनिष्का ला सुवर्ण तर प्रतिभा ला रोप्य






**अक्षराज : शिवराज मूगळे**

**दि.०२, सोलापूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पुणे येथे झालेल्या शालेय विभागीय तायक्वांडो स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्वांदो अकॅडमी, मंद्रूपच्या खेळाडूंनी यश संपादन केले. या खेळाडूंची निवड राज्य स्पर्धेसाठी झाली आहे.या स्पर्धेत तनिष्का पवार हिने ५९ते६३ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकाविली, तर प्रतिभा राठोड हिने ४६ते ४९ किलो वजनी गटात रोप्य पदक तर अर्थव उंबर्जे ५५ते ५९ किलो वजनी गटात कांस्य पदक पटकाविली. तर सुवर्ण पदक खेळाडूंची छत्रपती संभाजी नगर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय तायक्वांडो स्पर्धेसाठी निवड झालीया खेळाडूंना दक्षिण सोलापूर तायक्वांडो अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. दक्षिण सोलापूर तायक्वांडो अकॅडमी अध्यक्ष प्रवीण जोडमोटे, रेश्मा राठोड, सचिन कुंभार, सिध्दाराम विजापूरे, प्रदीप धुळखेडे गणेश सोलापुरे, महेश देविदास यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# निवघ्यात राम भक्तांचा शेतकऱ्यांना धीर; गावात चुलबंद आवतान



अक्षराज : साहेबराव गागलवाड

दि.०२, मुदखेड (नांदेड) : शेतकऱ्यांवर निसर्ग कोपला असल्याने धीर देण्यासाठी ,सुख-समृद्धी लाभावी यासाठी ईडा पिडा टळो....बळीचे राज्य येवो... यासाठी रामभक्तांनी नवरात्र महोत्सवात सामूहिक आराधना केली असून या महोत्सवाची सांगता गावकऱ्यांना चुलबंद अवतान देऊन गुलाब जामुन चा महाप्रसाद वाटप करण्यात आला आहे.

यावेळी अतिवृष्टीचा पावसामुळे सर्व शिवारातील पिक पाण्याखाली गेल्याने शेतकरी पूर्णतः कोलमडून गेला आहे . याशिवाय बागायती शेतकऱ्यांच्या केळी पिकाला कवडीमोल भाव असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. लागवड खर्चही निघत नसल्याने हिरमुसलेल्या शेतकऱ्यांना धीर देण्याच्या दृष्टीने राम भक्तांनी नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधून धार्मिक उपक्रम राबविला आहे. यानिमित्ताने पूजा पाठ, मंत्र जप, होम हवन, हरिपाठ, सामूहिक पारायण, नित्य नियमित महाआरती करून आराधना केली आहे. विशेष म्हणजे गावातील युवकांसाठी व्यसनमुक्ती अभियान राबवून समाजात आदर्श निर्माण केला असून आजचा युवक देशासाठी तसेच धर्मासाठी महत्त्वाचा कणा असल्याचे पटवून देण्यात आले.

तालुक्यातील मौजे निवघा गावात सर्वधर्मसमभावाची भावना तसेच रुढी, प्रथा व परंपरा जोपासण्याची पद्धत आजही कायम आहे. या माध्यमातून सर्वधर्मीय सामाजिक महोत्सव एकत्रित येऊन साजरी केले जातात हे या गावचे विशेष होय. कार्तिक महोत्सव तर दिवाळीप्रमाणे गावातील सर्व धर्मपंथातील लेकी बाळींना विशेष निमंत्रण देऊन बोलविले जाते. रामभक्तांनी यावर्षी शेतकऱ्यांसाठी राबविलेला उपक्रम संकटाच्या काळात धीर देणारा ठरला आहे.

सर्वधर्मसमभाव दुर्गादेवी मित्र मंडळाच्या वतीने गावकऱ्यांसाठी चुलबंद अवतान देऊन गुलाबजामुन चा मिष्ठान्न महाप्रसाद योगेश पवार मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. योगेश पवार यांच्या वतीने ८० किलो खवा महाप्रसादासाठी देण्यात आला होता. या सामाजिक उपक्रमासाठी श्रीराम मंदिर कमिटीचे अध्यक्ष बालाप्रसाद पवार, रंगराव पवार, लक्ष्मण पवार, उद्धवराव पवार, प्रकाश पवार, योगेश पवार, शिवाजीराव पवार, पुंडलिक पवार, बाबुराव पवार, नितीन पवार, आनंदराव पवार, व्यंकटराव पवार, सुभाष पवार, दत्तराव पवार, विश्वनाथ पवार, हनुमंत पवार, अशोक पवार, लक्ष्मण पवार, संजय पवार, होनाजी पवार, मधुकर पवार, बालाजी पवार, बाबुराव टेकाळे, शेख निजाम, शेख सय्यद, कमलाकर पवार, खंडू माने, गोविंद पवार, मारोती पवार सर्वधर्म समभाव मित्र मंडळाचे योगेश पवार, शरद पवार, प्रदीप पवार, आकाश पवार, ओमकार पवार, सोनू पवार, गजानन पवार, विनोद पवार, धनु पवार, सचिन भांगे, शिवम मुदळ, सुरज इंगोले, संदीप पवार, रामेश्वर पवार, अंकुश पवार, किसन पवार, सुरज पवार, हनुमान पवार यांच्यासह आदींनी पुढाकार घेतला होता.

# वाकडा येथे महिलांसाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०१, विंचूर (नाशिक) :** बुधवार, दि.०१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव वाकडा येथे महिलांसाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान अंतर्गत आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांच्या आरोग्याला एक नवा आयाम देण्यासाठी जिल्हा वैद्यकीय अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी आणि वैद्यकीय अधिकारी प्रा आ केंद्र निमगाव वाकडा यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या आरोग्य शिबिरात स्त्रीरोग, बालरोग, नेत्रचिकित्सक, आहार समुपदेशक, योगमार्गदर्शन अश्या सर्व सेवा एकाच छताखाली देऊन एकूण २३९ लाभार्थींना मोफत आरोग्य सेवा देण्यात आल्या.आरोग्य तपासण्या बरोबरच तज्ज्ञ मार्गदर्शन आणि रक्त तपासणी, रक्तदाब, मधुमेह, क्षयरोग, अॅनिमिया, तपासणी,महिलांसाठी खास सेवा, किशोरवयीन मुलींना विशेष मार्गदर्शन, पोषण आहार मार्गदर्शन, आभा कार्ड आयुष्मान कार्ड, गोल्डन कार्ड या माध्यमातून लासलगाव, विंचूर, पाचोरा, पिंपळगाव नजीक, निमगाव वाकडा येथील गरोदर महिलांची, वृद्ध महिला पुरुष, बालके, किशोरवयीन मुली, मुले यांच्या मोफत आरोग्य तपासण्या करून आरोग्या शिक्षण देण्यात आले.

त्यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश पाटील आणि डॉ.वरुणराज ठाकरे, बालरोग तज्ज्ञ डॉ. सागर घनघाव, नेत्र रोग तज्ञ श्रीमती ऐश्वर्या महाजन, समुपदेशक विकास आडे, राष्ट्रीय बाल संगोपन पोषण आहार समुपदेशक विकास आडे, योगशिक्षक भूषण वडनेरे, आरोग्य निरीक्षक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, समुदाय आरोग्य अधिकारी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, रक्त संकलक,आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा गट प्रवर्तक, आशा सेविका, आणि अंगणवाडी कार्यकर्त्या, परिचर, वाहनचालक, डाटा ऑपरेटर यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान केले. फक्त आरोग्य तपासणी नाही, तर महिलांच्या आत्मसन्मानाचा, विश्वासाचा आणि आरोग्यदायी भविष्यासाठीच्या आशेचा दीपस्तंभ आहे.अशी प्रतिक्रिया डॉ. अविनाश पाटील यांनी दिली.

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अनुकंपा नियुक्ती

## गरजू कुटुंबांच्या घरात एका क्षणात परतला आनंद




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, ठाणे :** अनेक वर्षांपासून नोकरीच्या प्रतिक्षेत असलेल्या गरजू कुटुंबांसाठी शासनाकडून एक अत्यंत आनंदाचा निर्णय घेण्यात आला आहे. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती प्रक्रियेला गती देऊन, शेकडो कुटुंबांच्या जीवनात आशेचा नवा किरण आणला आहे. या नियुक्तीमुळे केवळ नोकरीच नाही, तर त्या कुटुंबांना मोठा भावनिक आणि आर्थिक आधार मिळाला आहे, ज्यांनी आपल्या कर्त्या पुरुषाला गमावले आहे.

***शासनाचा संवेदनशील निर्णय***

राज्यातील अनुकंपा नियुक्तीची प्रक्रिया वेगवान करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील शासनाने १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्ती देणे, या बाबीचा समावेश केला होता आणि ही कार्यवाही पूर्ण करण्याकडे विशेष लक्ष दिले होते.

प्रशासनाने घेतलेल्या कठोर परिश्रमांमुळे अनेक प्रलंबित प्रकरणे मार्गी लागली आहेत. या नियुक्ती प्रक्रियेत केवळ नियमांचे पालन केले नाही, तर प्रत्येक कुटुंबाच्या भावनांचा आणि गरजांचा संवेदनशीलतेने विचार करण्यात आला. या प्रयत्नांमुळे, एका क्षणात अनेक घरांमध्ये आनंद परतला आहे.

***नियुक्ती पत्रांचे वाटप: एक भावनिक क्षण***

नियुक्तीपत्रांचे वाटप शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार आहे. मुंबई येथे सकाळी ११ वाजता होणाऱ्या राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्रे दिली जातील. त्याचप्रमाणे, प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात स्थानिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्याचा कार्यक्रम हा जिल्हा नियोजन भवन सभागृहात शनिवार, दि.४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा क्षण केवळ एक शासकीय सोहळा नसून, तो अनेक वर्षांच्या संघर्षाचा आणि प्रतिक्षेचा शेवट आहे. हे नियुक्ती पत्र म्हणजे केवळ एक कागद नसून, ते एका कुटुंबाचे भविष्य आहे, त्यांच्या आत्मसन्मानाची पुनर्स्थापना आहे.

***मेळाव्यातील यश आणि पुढील कार्यवाही***

यापूर्वी, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत १ सप्टेंबर आणि १८ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित केलेल्या मेळाव्यात एकूण ५९ अनुकंपाधारक उमेदवार उपस्थित होते. या मेळाव्यात १५ सरकारी कार्यालयांमधील गट 'क' संवर्गातील ५७ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नोकरीसाठी शिफारस करण्यात आली. यात २०१३ पासून प्रतिक्षा करीत असलेल्या काही जुन्या प्रकरणांचाही समावेश होता. या यशस्वी कार्यवाहीमुळे, जनतेचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. उर्वरित दोन जणांच्या शैक्षणिक व इतर पात्रतेनुसार रिक्त पदे उपलब्ध होताच त्यांनाही शासकीय कार्यालयात नियुक्ती देण्याविषयीची संधी राखून ठेवण्यात आली आहे. याचबरोबर ठाणे जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयातील गट ड संवर्गातील प्रतिक्षा सूची मधील ६७ अनुकंपा उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्याची कार्यवाही शासकीय कार्यालयाकडून करण्यात आली आहे.

***समुपदेशन मेळावा***

ठाणे ज़िल्ह्यात पात्र अनुकंपा तत्वावरील पात्र उमेदवाराच्या सोबत विविध कार्यालयाच्या आस्थापना विभागासोबत एकत्रित बैठक घेऊनउपलब्ध पदे, शैक्षणिक अहर्ता, पात्रता, वेतनश्रेणी, कामाचे स्वरूप, पदोन्नतील संधी, विशेष प्रावीण्य, तंत्रज्ञ इ. माहिती देण्यात आली होती. त्यामुळे घरातील कर्त्या माणसाच्या अवेळी जाण्याने आधार तुटलेल्या पाल्याना अनुकंपा उमेदवारांसाठी शासकीय नोकरीत येण्यासाठी आणि मिळालेल्या संधीची योग्य निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचे मार्गदर्शन सुखद,समाधानाचे आणि आशा उंचावणारे ठरले. आणखी एक विशेष बाब म्हणजेपोलीस आयुक्तालय व ग्रामीण पोलीस विभागातून यापूर्वी अनुकंपा तत्वावर विशेषत: पोलीस विभागातच नेमणूक होत होती. त्यामुळे शारीरिक पात्रता नसल्यास किंवा रिक्त पदे नसल्यास अनुकंपाचा लाभ मिळताना अडचणी येत होत्या. या कारणास्तव अनेक वर्षांपासून नियुक्या रखडल्या होत्या. त्याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांनी पुढाकार घेवून, विभागीय पातळीवरील तसेच जीएसटी विभागातील उपलब्ध रिक्त पदे ठाणे जिल्हयासाठी उपलब्ध करून घेतली. ठाणे जिल्ह्यात तिन्ही पोलीस आयुक्तालये आणि पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयाच्या बैठका घेतल्याने पोलीस विभागासह अनुकंपा प्रतिक्षा यादीतील जास्तीत जास्त उमेदवारांना जास्तीची संधी उपलब्ध झाली. ही संपूर्ण कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ,अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार रेवण लेंभे आणि आस्थापना विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी गेले चार ते पाच दिवस अहोरात्र विशेष मेहनत घेतली. त्यामुळे हे नियुक्तीपत्र मिळविणारे अनेक तरुण-तरुणी, वृद्ध आई-वडील आणि निराधार कुटुंबासाठी हा केवळ एक सरकारी आदेश नाही, तर त्यांच्या आयुष्यातील एक नवी सुरुवात आहे. या निर्णयामुळे शासनाने आणि प्रशासनाने हे सिद्ध केले आहे की, त्यांच्यासाठी केवळ विकासच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची काळजी घेणे, ही सुद्धा प्राथमिकता आहे.

# धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या पूर्वतयारीचा आढावा

## भोजनदान तसेच इतर कोणत्याही प्रकारचे स्टॉल रस्त्यावर नको, सर्वांनी समन्वयाने काम करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** दिनांक १५ आणि १६ ऑक्टोबर रोजी चंद्रपूर येथील दीक्षाभुमीवर साजऱ्या होणाऱ्या धम्म चक्र अनुप्रवर्तन दिनाच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीला अतिरिक्त जिल्हा पोलिस अधिक्षक ईश्वर कातकाडे, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, तहसीलदार विजय पवार, महानगर पालिकेच्या प्र. आयुक्त डॉ. विद्या गायकवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधाकर यादव, वाहतूक पोलिस निरीक्षक प्रवीणकुमार पाटील, महावितरणचे कार्यकारी अभियंता सुहास पडोळे, यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरीअल सोसायटीचे अध्यक्ष अरुण घोटेकर, उपाध्यक्ष अशोक घोटेकर आदी उपस्थित होते.



यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, चंद्रपूर शहरात होणाऱ्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या दोन दिवसीय कार्यक्रमासाठी तीन बाबी अतिशय महत्वाच्या आहेत. यात गर्दीचे योग्य नियंत्रण, स्टॉल व्यवस्था आणि वाहतूक व्यवस्था. गर्दी नियंत्रणासाठी योग्य नियोजन करावे. तसेच भोजनदान व इतर कोणतेही स्टॉल हे चांदा क्लब ग्राऊंडच्या आतमध्ये लावण्यात यावे. गाड्या तसेच बसेसची पार्किंग व्यवस्था, शहरातील पुतळ्याची स्वच्छता, दीक्षाभुमी परिसराची स्वच्छता, पाणी पुरवठा, मोबाईल टॉयलेट, वीज पुरवठा आदी कामे संबंधित विभागांनी गांभिर्याने पूर्ण करावीत. कार्यक्रमादरम्यान या परिसरातील वीज पुरवठा खंडीत होऊ नये, तसेच रस्त्यावर किंवा झाडांवर लटकणाऱ्या विद्युत तारांची त्वरीत तपासणी करावी. बाहेर गावावरून येणाऱ्या बसेसच्या पार्किंगची ठिकाणे आत्ताच निश्चित करावी. रोडनिहाय पार्किंग प्लान तयार करून त्यानुसार कार्यवाही करावी. पार्किंगस्थळ दर्शविणारे फलक लावावे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशासह निघणाऱ्या रॅलीदरम्यान चोख बंदोबस्त ठेवावा. महानगर पालिकेने दीक्षाभुमी परिसरातील आजुबाजुच्या रस्त्यांची दुरुस्ती तसेच साफसफाईची कामे करावी. मोबाईल टॉयलेट, हायमास्ट लाईट, कार्यक्रमाच्या ठिकाणी अग्निशमन गाड्या उपलब्ध करून द्याव्यात. रस्त्यावर स्टॉल नको धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त विविध सामाजिक संघटनांकडून भोजनदानाचे तसेच इतर स्टॉल लावण्यात येतात. सदर स्टॉल रस्त्यावर न लावता चांदा क्लब ग्राऊंडच्या आतमध्ये लावावेत, याची सर्व सामाजिक संघटनांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त, सर्व यंत्रणांनी योग्य समन्वय ठेवून आपापली जबाबदरी पार पाडावी. येणाऱ्या नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी. सामाजिक संघटना, नागरिकांनी जिल्हा प्रशासनाला योग्य सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

# थोडक्यात

## जवळगा येथे खा.डॉ.काळगे यांनी केली अतिवृष्टीच्या नुकसानीची पाहणी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, देवणी (लातूर) :** देवणी तालुक्यातील जवळगा येथे झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे व ग्रामस्थांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांसह घरांचे, रस्त्यांचे व जनावरांच्या चार्याचे मोठे नुकसान झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी लातूर जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार डॉ.शिवाजी काळगे व लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे नूतन जिल्हाध्यक्ष अभयदादा साळुंके दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी जवळग्यात दाखल झाले. यावेळी गावचे माजी सरपंच व प्राचार्य डॉ. रामलिंगजी मुळे यांच्यासह ग्रामस्थांशी सखोल चर्चा झाली. ग्रामस्थांनी शेतातील उभे पीक, जनावरांचे नुकसान तसेच घरांची पडझड याविषयी तक्रारी मांडल्या. खासदार डॉ.शिवाजी काळगे यांनी या वेळी स्पष्ट निवेदन दिले की, शेतकऱ्यांचे झालेले नुकसान हे गंभीर आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करावी. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आम्ही ठामपणे लढू आणि जेवढं होईल तेवढं करून दाखवू. या संकटाच्या काळात काँग्रेस शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभी आहे.तसेच जिल्हाध्यक्ष अभयदादा साळुंके यांनी सांगितले की, खर्डणीसह संपूर्ण देवणी तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी आम्ही प्रशासनाकडे पाठपुरावा करू. काँग्रेस पक्ष हा शेतकरी व सामान्य जनतेचा पक्ष आहे. आज भाजपा सरकार सत्तेत आहे, त्यांनी तातडीने मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, ही आमची ठाम मागणी आहे. ग्रामस्थांनी यावेळी खासदार व जिल्हाध्यक्ष यांना निवेदनही सादर केले. स्थानिक लोकांनी ही काँग्रेस नेत्यांच्या या भेटीचे स्वागत करत आशा व्यक्त केली की, त्यांच्या पाठपुराव्यामुळे शासनाकडून लवकरात लवकर मदत जाहीर होईल.

# विधायक कृतीतून आणि दैनंदिन सदाचारी वृत्तीतून राष्ट्रभक्ती सिद्ध हीच एकात्मता

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०१, खंडाळा (सातारा) :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय,राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित राष्ट्रीय एकात्मता सप्ताह समारोप नुकताच शहिद भगतसिंग आणि आजची तरुणाई या विषयावरील द्विसत्रिय व्याख्यानमालेतून झाला. प्रारंभी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा.ऋतुजा नवसरे संयोजित मान्यवर व विद्यार्थ्यांच्या हस्ते महाविद्यालय आवारात वृक्षारोपण करण्यात आले.व्याख्यान समारंभात उपप्राचार्य डॉ.प्रतिभा पाटणे आणि रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रदीप मेंढापुरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

साधनव्यक्ती म्हणून ग्रामस्वराज्य सेवाभावी संस्थेचे संस्थापक संदीप ननावरे आणि सुप्रसिद्ध कवी आनंद भारमल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.प्रथम सत्रात संदीप ननावरे म्हणाले-ब्रिटिश गुलामीत असणाऱ्या भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य तरुण क्रांतिकारकांनी अन्यायी आव्हान असणाऱ्या ब्रिटिशांपुढे निर्भीडपणे स्वातंत्र्याची मागणी केली यातील क्रांतिकारी म्हणजे शहिद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव होय ज्यांनी इन्कलाब जिंदाबादरुपी क्रांतिज्वाला प्रज्वलीत केली.वर्तमानात ब्रिटिश नाहीत पण असंख्य आव्हाने आहेत,वाढते स्त्री अत्याचार,मानवी हस्तक्षेपाने निसर्गाची केलेली अवहेलना याचे दुष्परिणाम याविरुद्ध चीड निर्माण होऊन विधायक कृतीची पायाभरणी करायला हवी.



द्वितीय सत्रात कवी आनंद भारमल म्हणाले-स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रखर लढ्याचा मार्ग खडतर होता परंतु अशक्य नव्हता,सातत्यपूर्ण प्रयत्नातून मानवी मूल्यांना दुभंगणारी प्रवृत्ती मोडीत काढत सदाचारी मार्गाने वस्तुस्थितीचा स्वीकार करत स्वातंत्र्य प्राप्तीला आयाम दिला.सद्यस्थितीत तरुणाईने केवळ आभासी आयुधाद्वारे प्रसारित होणाऱ्या बाबींवर विश्वास न ठेवता त्याग समर्पण आणि बलिदान चा खरखुरा इतिहास स्मरण करावाअसे आवाहन केले.

आजच्या तरुणाईने दैनंदिन जीवनात सदाचारी वृत्तीतून आणि विधायक कृतीतून जे चुकीचं घडत आहे त्याचा बिमोड करण्यासाठी नेतृत्व करावे हीच आजची राष्ट्रभक्ती आणि देशाची एकात्मता अबाधित ठेवण्याचे आवाहन दोन्ही वक्त्यांनी केले. महाविद्यालयचा रासेयो आणि इतिहास विभाग आयोजित व्याख्यानमालेची विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रमुख सूत्रे हाताळली.

सूत्रसंचालन अक्षय देशमाने बीए भाग ०३ तर आभार ओम बिचुकले बीए भाग ०१ याने केले.इतिहास विभाग प्रमुख प्रा.प्रतिक्षा माने,सहकारी प्रा.रोहिणी मोरे,रासेयो विभाग समितीने विशेष परिश्रम घेतले.यावेळी महाविद्यालयातील सर्व विभाग विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

## वनस्पती-वन्यप्राणी संरक्षणासाठी जनजागृती रॅली

### वन्यजीव सप्ताहानिमित्त निफाड वन उद्यानात उपक्रम




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** १ ते ७ ऑक्टोबर या वन्यजीव सप्ताहानिमित्त निफाड वन उद्यान व AREAS फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने वनस्पती आणि वन्यप्राणी संरक्षण व संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले. ही रॅली निफाड वन उद्यान – दिंडोरी तास – नांदूर मधमेश्वर – मांजरगाव – करंजगाव या गावांमध्ये काढण्यात आली. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांना व नागरिकांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच थळीवो कळसह डलहेश्र निफाड, कैलासवासी तात्यासाहेब बोरस्ते विद्यालय नांदूर मधमेश्वर व आरूढ महाविद्यालय म्हाळसाकोरे येथे विशेष जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. या प्रसंगी वनपरिक्षेत्र अधिकारी येवला प्रा.राहुल घुगे, वनपरिमंडळ अधिकारी जयराम शिरसाठ, भाऊसाहेब माळी, वनरक्षक विजय दोंदे, पंकज नागपुरे, गोपाल हारगावकर, गोपाल राठोड, वंदना खरात, सोनाली वाघ तसेच आधुनिक बचाव पथक निफाड व AREAS फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# स्वत: मध्ये लपलेल्या रावणाचे दहन कधी करणार?



भारतातील अनेक शहरांमध्ये दसरा सणाच्या दिवशी रावणाचे मोठमोठे पुतळे जाळले जातात.यावर्षीही

दसरा सणाच्या दिवशी रावणाच्या मोठमोठ्या पुतळ्यांचे दहन करण्यात आले.दसरा सणाच्या निमित्ताने लहान मोठ्या शहरांमध्ये रावणाचे मोठमोठे पुतळे जाळण्याची स्पर्धा लागली होती. रावणाचे पुतळे दरवर्षी जाळले तरीही समाजातील रावणाची संख्या कमी न होता ती झपाट्याने कसे काय वाढत आहे?याचा अर्थ असा होतो की रावणाचे पुतळे जाळणे एक छंद झाला आहे.ते एक मनोरंजनाचे साधन झाले आहे.रावणाचे पुतळे जाळले जातात ही चांगली गोष्ट आहे पण रावणाचे पुतळे जाळणारे नेमके कोण असतात?रावणाचे पुतळे जाळणारे खरोखर चांगले असतात का?त्यांचे विचार,त्यांचे वर्तन,त्यांचे चारित्र्य खरोखर बावनकशी सोने असते का?

दसरा सण जवळ येऊ लागला की रावणाचे पुतळे जाळण्याची जय्यत तयारी सुरू केली जाते. ही तयारी करणारे लोक मोठ्या जोमाने रावणाच्या पुतळ्यांचे दहन करण्यासाठी खूप उत्सुक असतात. पण रावणाचे पुतळे जाळणारे खरोखर चांगले असतात का?याचा विचार होणे आवश्यक आहे. रावणाचे पुतळे जाळणे म्हणजे वाईटांवर चांगल्या लोकांचा विजय असे म्हटले जाते.दसरा सणाच्या दिवशी दरवर्षी मोठ्या अभिमानाने रावणाचे पुतळे जाळतात ही खरंच चांगली गोष्ट आहे.परंतु,आपल्या स्वतः मध्ये लपून बसलेला रावण तसाच जीवंत राहतो.त्या रावणाचे नेमके काय करायचे?रावणाचे पुतळे जाळताना फटाक्यांची आतिषबाजी केली जाते,टाळ्या वाजवून आनंद साजरा केला जातो.पण त्याचवेळी स्वतःच्या मनात लपलेला रावण हा कुत्सितपणे हसत असतो.त्याचे समूळ उच्चाटन कधीच होत नाही. रावणाचे पुतळे जाळणारे लोक हे स्वार्थी,वासनांध,कुविचारी,निर्दयी, चारित्र्यहीन,आळशी,कामचुकार, भ्रष्टाचारी व कुवर्तनी असतात.असे असले तरीही ते स्वतःला खूप चांगली व्यक्ती समजतात.काही महाभाग रावणाच्या पुतळ्यांचे दहन करताना स्वतःला फार मोठा व कर्तृत्ववान समजतात.प्रत्यक्षात मात्र तसे काही नसते.रावणाचे पुतळे जाळणारे,रावण दहन मोठ्या अभिमानाने पाहणारे सगळे चांगले असतात याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही.

रावणाचे पुतळे जाळण्यासाठी जेवढा पुढाकार घेता तेवढाच पुढाकार स्वतःमधले दुर्गूण जाळण्यासाठी घ्या.आपल्या आसपास मानवाच्या रुपातील रावणांची संख्या वाढत आहे. दुसऱ्यांच्या आयाबहिणींकडे वासनांध नजरेने बघणारे रावण गल्लोगल्लीत दिसतात.अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणारे आणि अबला नारींवर बलात्कार करणारे असंख्य रावण वाढले आहेत.अनेक व्यसनांची तलफ लागलेले हजारो रावण आपल्याच आईवडिलांना शिव्या घालतात.शेतीच्या वाटणीसाठी सख्या नातेवाईकांचे मुडदे पाडणारे रावण गावागावांत संख्येने खूप वाढले आहेत.वृध्द आईवडिलांना वृद्धाश्रमात ठेवणारे विकृत मनोवृत्तीचे पोरं रावणापेक्षाही दुष्ट असतात. स्वत:च्या जातीचा व धर्माचा अहंकार बाळगणारे धर्मांध लोक जातीभेद व धर्मद्वेष सोडायला तयार नाहीत.केवळ माणुसकीच्या नात्याने मनमोकळे जीवन न जगता संपत्तीचा,पदाचा व मोठेपणाचा फुकटचा गर्व बाळगणारे रावण जिकडे तिकडे आढळतात. राजकीय क्षेत्रातील काही लोकांचे कारनामे रावणालाही लाजवणारे असतात.मानवांच्या रुपातील विविध दुष्ट प्रवृत्तींच्या रुपातील रावणांपैकी एक रावण आपण प्रत्येक जण असतो.अशी विचित्र परिस्थिती असताना स्वतः मध्ये लपलेल्या रावणाचे दहन करणे काळाची गरज बनली आहे.तेव्हा प्रतिकृती रुपातील रावणांचे पुतळे जाळण्यापेक्षा व हवा प्रदूषण करण्यापेक्षा आपण सगळ्यांनी मिळून दसऱ्याच्या दिवशीच नाही तर गरज असेल तेव्हा स्वतःच्या मनात घर करून बसलेल्या रावणाचे वेळीच दहन करायला हवे.

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट,ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.**

## ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची आणखी एक संधी

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, ठाणे :** राज्यातील अतिवृष्टी व पूर परिस्थितीचा विचार करून विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची आणखी एक शेवटची संधी देण्यात येत आहे. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. याबाबतचे सविस्तर वेळापत्रक दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पत्रकार परिषद घेऊन जाहीर करण्यात येणार असल्याचे शिक्षण संचालक (माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी कळविले आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून संपूर्ण राज्यामध्ये इयत्ता ११ वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहेत. आतापर्यंत इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या १० फेऱ्या राबविण्यात आलेल्या आहेत. इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या संधीबाबतच्या सविस्तर सूचना ३ ऑक्टोबर रोजी निर्गमित करण्यात येणार आहेत. या फेरीमध्ये भाग- २ व प्राधान्यक्रम नोंदविणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास गुणानुक्रमे कनिष्ठ महाविद्यालय देण्यात येणार आहे. विद्यार्थी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी या प्रवेश प्रक्रियेची नोंद घ्यावी, असे आवाहन शिक्षण संचालकांमार्फत करण्यात आले आहे.